**अतितात्काळ/कालमर्यादा**

क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/२६/२०२३ मुंबई, दि.०६/१०/२०२३

संदर्भ:- या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/२६/२०२३, दि.१२/०९/२०२३

विषय:- राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँक/ वित्तीय संस्थामार्फत कर्ज व्यवस्था.

******

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भाधीन आदेशान्वये एकूण ३८४ पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजुर करण्यात आलेले आहे. तसेच सदर आदेशानुसार खालील नमुद सर्व घटक कार्यालयास मंजूर करण्यात आलेली घरबांधणी अग्रिमाची रक्कम संबंधीत कार्यालयाच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यावर वितरीत करण्यात आलेली आहे.

घटक कार्यालयाने संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिमाची रक्कम वितरीत केल्यानंतर सॉफ्टवेअरमध्ये त्याचा UTR नंबर अद्यावत करणे आवश्यक आहे. त्यानंतर संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या कडुन वसुल करावयाच्या हप्त्याची माहिती सॉफ्टवेअरमध्ये अद्यावत होते. व त्याप्रमाणे संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे कडुन हप्ते वसुल करावयाचे असतात. **परंतु असे निदर्शनास आले आहे की, बहुतेक घटक कार्यालयाने संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिमाची रक्कम वितरीत केल्यानंतर सॉफ्टवेअरमध्ये त्याचा UTR नंबर अद्यावत केलेला नाही. त्यामुळे त्यांच्या घरबांधणी अग्रिमाच्या हप्त्याची रक्कम सॉफ्टवेअरमध्ये दिसत नाही. त्यामुळे ज्या घटक कार्यालयाने अग्रिमाची रक्कम संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना वितरीत केल्याचा UTR नंबर अद्यावत केलेला नाही, त्यांनी संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना रक्कम वितरीत केल्याचा UTR नंबर सॉफ्टवेअरमध्ये तात्काळ अद्यावत करावा.**

**सॉफ्टवेअरमध्ये UTR नंबर अद्यावत करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-**

१. सॉफ्टवेअर Login करावे, त्यानंतर Dis**b.and EMI Management** मध्ये जावे,

२. त्यानंतर Hba Received and Disb. To Applicant वर Click करावे,

३. त्यामध्ये शेवटी लाल दिसणाऱ्या Tranche Id वर Click करावे,

४. त्यामध्ये घरबांधणी अग्रीम मंजुर झालेल्या अधिकारी/अमंलदार यांची नावे दिसतील. प्रत्येक अधिकारी/अमंलदार यांचे नावासमोर त्यांचा UTR/Transaction ID नमुद करुन Submit करावे.

खालील नमुद घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, संदर्भाधीन दि.१२/०९/२०२३ च्या आदेशान्वये ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजुर झालेले आहे. त्यामधील किती पोलीस अधिकारी/अंमलदार यांना रक्कम वितरीत केली व किती पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची रक्कम या कार्यालयास परत केली याबाबतचे **प्रमाणपत्र सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात या कार्यालयास पाठवावे.** तसेच **ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची रक्कम परत केली आहे त्यांची माहिती खालील तक्त्यात भरुन आजच** या कार्यालयास desk३१.dgoffice@ mahapolice.gov.in या ईमेलवर पाठवावे, ही विनंती.

| अ क्र | रक्कम परत केलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे नाव | मुद्दल रक्कम | व्याजाची रक्कम | एकूण रक्कम (मुद्दल + व्याज) | पोलीस महासंचालक कार्यालयास रक्कम परत केल्याचा दिनांक | रक्कम परत करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| **टिप:- रक्कम परत केल्याचे बँक स्टेटमेन्ट सोबत जोडावे.** | | | | | | |

६/१०/२३

( निसार तांबोळी )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई यांचे कार्यालय

**प्रति,**

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुबई(सस्नेह)

महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, मराष्ट्र राज्य,मुंबई(सस्नेह)
पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर/ नागपुर शहर/ नाशिक शहर/ नवी मुंबई/पुणे शहर/ लोहमार्ग मुंबई/
सोलापूर शहर/ ठाणे शहर/ पिंपरी चिंचवड
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण/ दक्षिण
प्रादेशिक विभाग, पुणे/ उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे
पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण/ बीड/ भंडारा/ बुलडाणा/धुळे/ गडचिरोली/ गोंदिया/ हिंगोली/ जळगांव/
कोल्हापूर/ नांदेड/ नंदुरबार/ नाशिक ग्रामीण/पालघर/ पुणे ग्रामीण/ लोहमार्ग नागपूर/ रत्नागिरी/
सोलापूर ग्रामीण/ ठाणे ग्रामीण/ यवतमाळ/ अहमदनगर/ सिंधुदूर्ग
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१/३/६/७/८/९/११/१२/१३/१४/१६/राज्य अपत्ती प्रतीसाद दल, धुळे
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर/ गुन्हे अन्वेषण व प्रशिक्षण विद्यालय, नाशिक
प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर/ रा.रा.पो.बल.नानवीज,दौंड/ सोलापूर/ जालना
उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोकण भवन/ नाशिक/ ठाणे

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/२६/२०२३, दि.१२/०९/२०२३ अन्वये--------------- (कार्यालयाच्या नाव नमूद करावे)या कार्यालयाच्या आस्थापनेवरील एकूण---------इतक्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिमा करीता रु.--------इतकी रक्कम मंजुर करण्यात आलेले आहे. त्यापैकी एकूण -------- इतक्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना रु.----------/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरीत--------- इतक्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची रु.-------/ इतकी रक्कम पोलीस महासंचालक कार्यालयास दि.------- रोजी परत पाठविण्यात आलेली आहे.

**संबंधीत कार्यालय प्रमुखाची पदनामासह स्वाक्षरी**
(पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/समादेशक)